original. Dox

**शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,**
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४/पुवि/२०२२/४०७९ 13 APR 2022

प्रति,

मा.अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई-३२.

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ शाळा इरादापत्र मिळणेस्तव अर्ज

**नमूना एक क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाचा अहवाल**

डी.वाय.पाटील इंटरनॅशनल अॅकडमी पुणे संचलित डी.वाय.पाटील इंटरनॅशनल स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स च-होली बु ता. हवेली जि. पुणे

संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई कडील महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा /(स्थापना व विनियमन) नियम २०२०, अधिसूचना दिनांक ५.१०.२०२०

२ क्षेत्र प्राधिकरण समिती,पुणे सभा प्रपत्र अ, अ.क्र. ७, दिनांक १.४.२०२२ नुसार मान्य प्रस्ताव

३. श्री.प्रदिप पडोळे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. एसएएफएस-१११४/प्र.क्र. २९९/एसएम-२ दि. २८.३.२०२२

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करणेत येते की, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित दर्जावाढ शाळेस इरादापत्र मिळणेचे अनुषंगाने संदर्भीय क्र. २ च्या क्षेत्र प्राधिकरण समितीचे सभा दिनांक १.४.२०२२ मधील प्रपत्र अ, अ.क्र.७ व्दारे खालील तपशीलानुसार प्रस्ताव मान्य झालेला आहे.

आता सदर नवीन शाळेस इरादापत्र मिळणेस्तव ऑफलाईन प्रस्ताव संदर्भीय क्र. १ च्या अधिसूचनेमधील नमूद तपशीलानुसार तसेच संदर्भीय क्र. ३ चे पत्राव्दारे कळविलेनुसार क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाच्या दिनांक १.४.२०२२ रोजीच्या सभेस उपस्थित अध्यक्ष/सदस्यांचे स्वाक्षरीसह या पत्राव्दारे प्रस्ताव शासनास शिफारशीसह सादर करीत आहोत.

स्विकार व्हावा ही विनंती.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | दर्जावाढ शाळेचे नांव व ठिकाण | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | माध्यम | शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डी.वाय.पाटील इंटरनॅशनल अॅकडमी पुणे | डी.वाय.पाटील इंटरनॅशनल स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स च-होली बु ता. हवेली जि. पुणे | आय. सी. एस. ई. | इ. ६ वी ते इ. १२ वी सर्व शाखा | इंग्रजी | इ. ६ वी ते इ. १२ वी सर्व शाखा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर, |

आपले विश्वासू

(सुनंदा वाखारे)
सदस्य, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,
तथा शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद,पुणे

(वैशाली बच्छाव)
सदस्य,क्षेत्र प्राधिकरण तथा
प्रतिनिधी जि.शि.प्र.सं.पुणे

(औदुंबर उकिरडे)
अध्यक्ष,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,तथा
शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे

(संध्या गायकवाड)
सदस्य, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,
तथा शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, पुणे

(अंकुश शिंदे)
सदस्य सचिव, क्षेत्र प्राधिकरण तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत : शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे माहितीस्तव

<u>स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर</u>

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/५७ /१६
पुणे १ दिनांक :- ३०/०१/२०१६

प्रति,

अध्यक्ष/सचिव
डी. वाय पाटील इंटरनॅशनल अॅकॅडमीचे
डी. वाय पाटील नॉलेज सिटी,
चऱ्होली बु , लोहगांव ता. हवेली जि. पुणे

विषय:- सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (क्र. १ ,६ व २४) २०१२.
२)शासन निर्णय एसएफएस १०१४/प्र.क्र.१७०/भाग -१/एसएम-२ मंत्रालय मुंबई दि.२ जुन २०१५.
३) मा.शिक्षणउपसंचालक, पुणेविभाग, पुणे यांचेकडील आदेशक्र. शिउसं/प्राथ-२/ स्वयंअशाळा/मान्यता ११६३८/४१ दि.३० जुन २०१५.

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच **विद्यमान शाळेचा दर्जावाढ** करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार **नविन शाळा स्थापन करणेकरिता /विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्याकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | मुळ यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | सुरु असलेल्या वर्गासहीत | शाळा सुरु केल्याचा दिनांक | नविन शाळा/ दर्जा वाढ | शाळेचा प्रकार (प्राथमिक/उच्च प्राथमिक) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ७ | ८ | ९ |
| १ | १८१ | डी. वाय पाटील इंटरनॅशनल अॅकॅडमीचे डी. वाय पाटील नॉलेज सिटी, चऱ्होली बु , लोहगांव पिन ४१२ १०५ | डी. वाय पाटील इंटरनॅशनल स्कुल, डी. वाय पाटील नॉलेज सिटी , चऱ्होली बु , लोहगांव पिन ४१० ५०४ | इंग्रजी | इ. १ ली ते ५ वी | जून २०१५ पासून | नवीन शाळा | प्राथमिक ते माध्यमिक |

<u>अटी व शर्ती</u>

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०३ अन्वये सन २०१५-१६ मध्ये सुरु असलेल्या वर्गासह परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
४. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.
५. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका, पुणे-५.